# ग्रामीण, दलित, स्त्रीवादी, आदिवासी, मुस्लिमआदी साहित्यप्रवाहतील संस्कृती दर्शन

**विशाल गौतम साळवे**

संशोधक विद्यार्थी, मराठी विभाग,सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

**DOI: https://doi.org/10.5281/zenodo.17259871**

## ABSTRACT:

स्वातंत्र्योत्तर काळात मराठी साहित्यात ग्रामीण, दलित, आदिवासी, स्त्रीवादी आणि मुस्लिम यांसारखे महत्त्वपूर्ण वाङ्मयीन प्रवाह उदयास आले. हे प्रवाह केवळ साहित्यिक अभिव्यक्ती नसून, ते महाराष्ट्रातील सांस्कृतिक परिवर्तन, सामाजिक न्याय आणि आत्मभान यांसारख्या मूल्यांचे दर्शन घडवतात. प्रस्तुत लेख या विविध साहित्यप्रवाहांमधून व्यक्त होणाऱ्या संस्कृतीचे सखोल विश्लेषण करतो. ग्रामीण साहित्य कृषीसंस्कृतीचे वास्तव, दलित साहित्य वेदना आणि विद्रोहाची संस्कृती, आदिवासी साहित्य निसर्गाशी असलेले नाते आणि आदिम जीवनशैली, तर स्त्रीवादी साहित्य पुरुषसत्ताक व्यवस्थेला आव्हान देत स्त्रीचे माणूस म्हणून असलेले स्थान स्पष्ट करते. मुस्लिम साहित्यातून धार्मिक सलोखा व बहुधार्मिकता व्यक्त होते. थोडक्यात, हे साहित्यप्रवाह महाराष्ट्राच्या सामाजिकसांस्कृतिक समृद्धीचे गतिमान आणि विस्तृत प्रतिबिंब आहेत.

## KEYWORDS:

मराठी साहित्य, संस्कृती दर्शन, दलित साहित्य, ग्रामीण साहित्य, स्त्रीवादी साहित्य.

**प्रस्तावना:**

मानवी जीवन आणि साहित्य यांचा अनोन्य संबंध आहे. मानवाच्या भावना, सुखदुःख, आनंदवेदना, सभोवतालचा निसर्ग, आजूबाजूचा समाज, या सर्व गोष्टींचा अंतर्भाव साहित्यात होत असतो. प्रत्येक भाषेचे साहित्य हे त्या समाजाचे संस्कार, परंपरा, इतिहास आणि संस्कृती यांसारख्या घटकांचे दर्पण असते. प्रत्येक भाषेत याप्रकारची सारखी अशी रचना दिसून येते. यात मराठी भाषा देखिल अपवाद नाही. मराठी भाषा ही सहाव्यासातव्या शतकापासून विकसित होत गेली. ती एक प्राचीन व समृद्ध भाषा आहे. संतसाहित्यभक्तीसाहित्य, लोकसाहित्य, शाहिरी वाङ्मय आणि स्वातंत्र्योत्तर काळात मराठी साहित्यात निर्माण झालेले विविध वाङ्मयीन प्रवाह हे मराठी साहित्यातील विकासात असलेले टप्पे आपणासमोर अगदी क्रमाने याप्रकारे येतात. भाषेच्या माध्यमातून समाजमनातील असणारे चढउतार, राजकीय घडामोडी, आध्यात्मिकता,वैज्ञानिक दृष्टीकोन तसेच आधुनिकतेची झेप याचे समग्र चित्रण आपणास मराठी साहित्यातून दिसून येते.

साहित्य आणि संस्कृती ही देखिल एकमेकांची अंगे आहेत. साहित्य हा केवळ शब्दांचा खेळ नसून तो जीवनाला दिशा देणारा, मानवाच्या विचारांना प्रगल्भ करणारा आणि सांस्कृतिक विकासाचा पुरावा देणारा एक अत्यंत महत्वाचा घटक आहे. मराठी साहित्यातून व्यक्त होणारी संस्कृती ही विस्तृत आणि विविध अंगांनी समृद्ध आहे. साहित्य म्हणजे केवळ कथा, कादंबरी,कविता, नाटक आणि लेख असतात असे नाही तर त्यासर्वांच्या मागे असलेली जीवनशैली, मुल्य आणि विविध परंपरांचे पैलू असतात. संस्कृतीची पायाभरणी ही एक प्रकारे मानवी वर्तनातून होत असते. ती संस्कृती विविध पिढ्यांत प्रवाहीत करण्याचे काम साहित्य करित असते. परंपरा आणि मुल्यही साहित्यातून व्यक्त होत असतात. तसेच संस्कृती टिकवण्यासाठी परंपरा आणि मुल्यच कारणीभूत असतात. मराठी साहित्यात आज आपणास ज्या सामाजिक व ऐतिहासिक चळवळी जाणवतात त्या आपल्या संस्कृतीच्या विकसित अवस्थेकडे चाललेल्या पाऊलखुणाच आहेत असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. बाराव्या शतकापासूनच्या ज्ञानेश्वरांच्या ज्ञानेश्वरीतील तत्वज्ञानापासून ते मध्ययुगीन काळातल्या संतसज्जन मंडळीच्या प्रभावापर्यंत भाषेतून व्यक्त होणारी सांस्कृतिक परिक्रमा हे संस्कृतीचे लोभस रूप दाखविते.

कथा, कविता, नाटकांच्या माध्यमातून भाषेची ख्याती व संस्कृतीचे झालेले सुरेख परिष्करण अधिक स्पष्ट होते. मराठी साहित्यकारांनी जसे म.फुले, अत्रे, पु.ल.देशपांडे, कुसुमाग्रज, अण्णाभाऊ, व.पु.काळे, शं. ना. नवरे यांनी सांस्कृतिक पाऊलखुणा अधिक भक्कम केल्या. आधुनिक काळात मराठी साहित्याने प्रतिगामी प्रभावाला धुडकावित आधुनिकतेच्या मागोमाग जाण्याचा प्रयत्न केला. यात सामाजिक न्याय, समता, स्त्रीचे अधिकार, कुटुंबव्यवस्थेतील बदल यांसारखे सांस्कृतीक परिवर्तन स्पष्टपणे दिसते. मराठी साहित्यातून व्यक्त होणारी संस्कृतीही अनेक पटीनी समृध्द होत आहे. मानवी समाजाच्या व व्यक्तीच्या जीवनशैलीला ही संस्कृती आकार देत आहे.

**मराठीतील विविध साहित्यप्रवाह व त्यातील संस्कृती दर्शन:**

देश स्वतंत्र झाला आणि प्रत्येकाला स्वातंत्र्याकडून असणाऱ्या अपेक्षा काय होत्या या सबंधी व्यापक स्वरूपात जाणीव सामाजिक पातळीवर झाली. प्रत्येकाच्या इच्छा, आकांक्षा, स्वप्ने, आपले वाङ्मय इत्यादी संदर्भात व्यक्त होण्याची आत असणारी सुप्त इच्छा अधिक तिव्रतेने बाहेर पडू लागली. स्वातंत्र्योत्तर काळात मराठी साहित्याचा प्रवाह हा अधिक विस्तारीत व्हायला लागला. सांस्कृतिक स्वातंत्र्य, सामाजिक समता व त्यातून आलेली समरसता, आणि त्यातही अधिक महत्त्वाचे म्हणजे मानवी प्रतिष्ठा ह्या अधिक व्यापक झाल्या. त्यातूनच मराठी साहित्यात ग्रामीण, दलित, स्त्रीवादी, आदिवासी, मुस्लिम, जैन, ख्रिश्चन साहित्य असे नवे प्रवाह याच काळात मागेपुढे अशा अंतराने उदयास आले. मानवाला स्वतःची ओळख करून त्याने स्वतःचे आत्मभान जागे केले. ज्याच्या हातात शब्दांचे सामर्थ्य आले त्यांनी सांस्कृतिक जाणिवेला हात घातला. बहुजनांनी ज्ञानाची कास धरली पाहिजे असा हेतू पुढे आला. मराठी साहित्यात यासंदर्भात ग्रामीण,दलित,आदिवासी,स्त्रीवादी, मुस्लिम व इतर साहित्यप्रवाहांनी मोठ्या प्रमाणावर संस्कृतीचे दर्शन घडविलेले दिसते. ते सांस्कृतिक दर्शन आपणास पुढील मुद्द्यांच्या आधारे पाहता येते.

**ग्रामीण साहित्य:**

ग्रामीण या विशेषणांतर्गत एक साहित्य परंपरा मराठी वाङ्मयात १९२५३० च्या सुमारास उदयास आली. तसा मोठा विचार केला तर या

साहित्याच्या पाऊलखुणा अगदी कृषी संस्कृतीच्या आरंभकाळापर्यंत जातात. ग्रामीण साहित्यात प्रामुख्याने ग्रामीण जाणीवा आहेत. या जाणीवा इतर साहित्य प्रवाहांपेक्षा निश्चितच वेगळया आणि आदिम स्वरूपाच्या आहेत. साहित्याच्या सुरुवातीपासूनच या साहित्यावर गांधीवादाचा प्रभाव जाणवतो. पण त्याचबरोबर 'सत्यशोधकी' विचारधारा यामागील प्रेरणा असल्याचे दिसते. ग्रामीण साहित्य चळवळीवरील प्रभाव हा राजर्षी शाहू महाराज आणि ब्राह्मणेत्तर चळवळीच्या कार्यकर्त्यांच्या विचार जागृतीचा परिणाम आहे. मराठी साहित्याची एक समृद्ध व महत्वाची परंपरा ही ग्रामीण साहित्याने जोपासली आहे. ग्रामीण जीवन, शेतकरी, खेडी, खेड्यांतील संस्कृती, ग्रामीण लोकांचा संघर्ष, दुःखआनंद, विविध लोकपरंपरा व विस्तृत सामाजिक जाणीवा यांचे चित्रण हे ग्रामीण साहित्यात येते. खेड्यांचा वास्तवदर्शी आलेख हा ग्रामीण साहित्यातून व्यक्त होतो. शेतकरी जीवन हा ग्रामीण साहित्यातील केंद्रबिंदू मानला जातो. कर्ज, दुष्काळ, गरीबी, शेतमजुरी, सावकारशाही, तेथील उपासमार हे विषय प्रमुख ठरतात. कृषी हा ग्रामीण सस्कृतीचा अविभाज्य भाग असल्याने ग्रामीण साहित्यातून कृषीकेंद्री जीवन आणि शेतकऱ्यांची जीवनपद्धती या संस्कृतीत विषद केली जाते. ग्रामीण जीवनाचे वास्तवदर्शी चित्रण, गावगाडा, तेथील मानवी भावविश्व सांस्कृतिक दृष्टिकोनातून समोर येते. गावातील सामाजिक संबंध हे शेतकरी, सुतार, लोहार यांसारख्या आलुतेदारबलुतेदार घटकांचा प्रकर्षाने विचार व्यक्त झालेला असतो. पिढ्यानपिढ्या चालत असलेल्या परंपरा, धार्मिक चालीरीती आणि सामाजिक मूल्ये ही संस्कृतीची विविध अंगे ग्रामिण साहित्यातून दिसून येतात. स्थानिकभाषा आणि बोली, भाषेतील शब्दसंग्रह व सांस्कृतीक विविधता ही भाषेतूनच जपलेली असल्याचे दिसते. जागतिकीकरणामुळे ग्रामिण व पारंपारीक व्यवसायांवर जे परिणाम झाले आहेत ते परिणाम 'बारोमास' या सदानंद देशमुख यांच्या कादंबरीतून व्यक्त होताना दिसतात. आण्णाभाऊ साठेंच्या लेखनात समाजातील वंचित वर्गाचे जीवंत चित्रण दिसते. शंकर पाटील यांच्य रंग्या रंगीला, भुताचा बंगला या ग्रामीण कथांतून ग्रामीण संस्कृती ठळक प्रकारे व्यक्त होते. ना.धो. महानोरांसारखे कवी हे ग्रामीण निसर्ग आणि शेतकऱ्यांचा संघर्ष मुक्तपणे व्यक्त करतात. थोडक्यात, ग्रामीण साहित्य हे ग्रामीण संस्कृतीचे गुणधर्म

आणि भोवतालची कृषीसंस्कृती यांचे सांस्कृतिक प्रतिबिंब उभे करते.

**दलित साहित्य:**

मराठी साहित्यातील दलित साहित्य हा एक महत्वाचा आणि प्रभावी असा प्रवाह आहे. दलित साहित्याचा उदय हा प्रामुख्याने साठोत्तरी कालखंडात झाला असे मानले जाते. त्याला बुद्ध, कबीर, चोखामेळा, तुकाराम यांसारख्या विचारवंतांच्या वैचारिक पायाभरणीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यकतृत्वाने या साहित्यात भक्कम प्रेरणा निर्माण केली. दलित साहित्याला सामाजिक बदलाची आस आहे. हाच दलित साहित्याच्या संस्कृतीचा केंद्रबिंद आहे. चोखामेळाकर्ममेळयाने देवाला प्रश्न विचारायला सुरुवात केली होती. त्याच्या उत्तरार्धात दलित साहित्यिकांनी देव या संकल्पनेवरच प्रश्न उपस्थित केला. देवधर्माला नकार देत येथील सामाजिक विषमतेविरुद्ध या साहित्याने सांस्कृतिक एल्गारच पुकारला. देव हे येथील सनातनी व्यवस्थेचे आपत्य आहे आणि हे आपत्य विचारात घेऊन येथील समाज व्यवस्थेने त्यावर आधारीत वलय निर्माण करून बहुजनांवर वर्चस्वाची स्वतंत्र्य व्यवस्था केली होती. महात्मा फुल्यांनी या व्यवस्थेलाच सुरुंग लावला. छत्रपती शाहू महाराजांनी लोकांना दिलेला राजकीय वारसा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेली अस्पृश्यांची उन्नती हा सामाजिक विकासाचा मोठा स्त्रोत दलित साहित्याचा प्रेरणास्त्रोत ठरला. दलित साहित्यातून व्यक्त होत असलेली संस्कृती ही शतकानुशतके अपमानित, वंचित व उपासमारीने वेदनेबरोबर संघर्ष करीत विद्रोहावर आधारलेली आहे. स्वातंत्र्याबरोबरच, समताबंधूता आणि त्याचबरोबर मानवी प्रतिष्ठा यांसारखी सामाजिक न्यायाची मूल्ये ही या दलित साहित्याच्या सांस्कृतिक अभिव्यक्तीतून स्पष्ट होतात. दलित साहित्यातून सर्वात आगोदर वेदना आणि विद्रोहाची संस्कृती दिसून येते. अन्याय, अपमान, गरीबी व शोषनास तीव्र विरोध या साहित्यात दिसतो. दलित साहित्यिकांनी बंड हाती घेतले असून स्वातंत्र्य, समता, बंधूतेबरोबरच विज्ञाननिष्ठा आणि लोकशाही या गोष्टींना अधिक महत्व दिले आहे. दलित साहित्यात सामाजिक बांधिलकी बरोबरच सांस्कृतिक अभिव्यक्तीचे भांडार आणि भाषेतील तडफदारपणा दिसून येतो. दया पवार, नामदेव ढसाळ, शरणकुमार लिंबाळे, बाबूराव बागूल, अण्णाभाऊ, उत्तम कांबळे यांनी आपल्या साहित्यातून स्वाभिमान,

समानता, बंधुभाव आणि न्याय या तत्वांवर आधारित लेखन करून मानवजातीला एक आशादायी सांस्कृतिक दिशा दाखविली आहे.

**आदिवासी साहित्य:**

१९६० नंतर ज्या सामाजिक व सांस्कृतिक जाणीवा निर्माण झाल्या त्यातील एक प्रवाह म्हणजे 'आदिवासी साहित्य' होय. मराठी साहित्यान एका वेगळ्या आणि आनोख्या असणाऱ्या जाणीवा आपल्या आदिमतेच्या पाऊलखुणा व्यक्त करतात. या दशकात दळणवळाच्या संसाधनांत क्रांती झाली. त्यातूनच माणूस हा अधिक दुर्गम प्रदेशात फिरू लागला. त्यामुळेच या नव्या जीवनाचा साहित्यप्रवाहाला परिचय झाला. लोकशाही शासनव्यवस्थेमूळे सर्वांना सामावून घेण्याची प्रक्रिया निर्माण झाली. त्यातूनच साहित्यक्षेत्रास आदिवासी घटकाचा परिचय झाला. आदिवासी साहित्याचा प्रवाह हा दलित साहित्यापेक्षा वेगळ्या जाणीवेचा आहे. आदिवासींच्या सामाजिक संदर्भात भौगोलिकता, वांशिकता आणि निसर्गविषयक असणारी संस्कृती या साहित्यातून व्यक्त होते. ते जल, जमीन आणि जंगल यांचे मूळ मालक आहेत. आदिवासींचा संपन्न सांस्कृतिक वारसा व इतिहास आहे. एकेकाळी हा समाज भाषाकलासाहित्य या क्षेत्रात पुढारलेला होता असे प्रसिद्ध लेखक विनायक तुमराम यांना वाटते. निसर्गसानिध्य, सांस्कृतिक संपन्नता, व धार्मिक आदिबंध हे आदिवासी साहित्यातून व्यक्त होतात. आदिवासी साहित्य हे आदिवासी समाज संस्कृतीचा आरसा आहे. निसर्गाशी जोडलेली जीवनशैली मौखिक स्वरूपाची परंपरा, सामाजिक जीवनशैली व चालीरीती, कला आणि उत्सवांचा समृद्ध वारसा या साहित्यातून येतो. आदिवासी साहित्य हे निसर्ग, देवदेवता आणि सामूहिकतेला व्यक्त करते. निसर्गाशी असलेले नाते हे त्यांच्या जीवनशैलीचा अविभाज्य घटक आहे. मौखिक परंपरांतून त्यांचे साहित्य हे पिढ्यानपिढ्या पुढे संक्रमित झाले आहे. यात लोकगिते, लोककथा, म्हणी व जीवन व्यवहाराचा समावेश होतो. आदिवासी साहित्यात वैयक्तिक जीवनापेक्षा सामूहिक जीवनावर अधिक प्रकाश टाकलेला दिसतो. यात व्यक्त होणाऱ्या इतिहास, कला आणि परंपरा ह्या सामूहिक आहेत. अनेकदा हे साहित्य हक्कांसाठी आणि आस्तित्वासाठी लोकांना जागे करण्याचे काम करते. आदिवासी साहित्य हे ऐतिहासिक वारसा आणि अस्मिता जपताना दिसते.

**स्त्रीवादी साहित्य:**

'स्त्रीवाद' ही एक समाज परिवर्तन घडवू पाहणारी तत्वप्रणाली आहे. १९६० नंतरच्या दशकात संपूर्ण जगात मोठ्या प्रमाणात स्त्रीयांविषयक चळवळी व साहित्याचे अस्तित्व जाणवू लागले. स्त्रीयांना पुरुषसत्ताक समाज व्यवस्थेत गुलामगिरीचे जीवन जगावे लागले. तीला भारतीय समाजव्यवस्थेत तर 'गृहलक्ष्मी' म्हणून एक शोभेची बाहुली बनविले होते. स्त्रीची दयनीय, दुबळी प्रतिमा पुसून टाकून आपले स्वतंत्र अस्तित्व निर्माण करने हे आवाहन स्त्रीवादाने स्विकारलेले दिसते. स्त्रीवादी साहित्यातून लिंगभावा इतकाच वंश, वर्ग, वर्ण, राष्ट्राच्या इतिहासाबरोबरच, स्त्रीकेंद्री अवकाशाचा परिचय येतो. स्त्रीयांची मूक संस्कृती आणि सामाजिक संरचना, सांस्कृतिक व वाङ्मयीन वारसा या साहित्यातून दिसून येतो. लेखिका प्रज्ञा लोखंडे लिंगभाव, दलितत्वाचे यातनादायी अनुभव, वर्चस्ववादी संस्कृती आपल्या लिखाणानातून व्यक्त करतात. सुबोध जावडेकरांसारखा लेखक स्त्रीयांच्या संवेदनशिलतेबर प्रकाश टाकतो. माधूरी शानबाग, रेखा बैजल, शुभदा गोगटे समाजाला न मानवणाऱ्या स्त्रियांच्या गोष्टी साहित्यातून व्यक्त करतात. गौरी देशपांडे आणल्या साहित्यातून मानवी नातेसंबंधाचा विचार करतात. स्त्रीवादी साहित्यातून व्यक्त होणारी संस्कृती म्हणजे स्त्रीयांच्या अभिव्यक्तीत अनुभवाना महत्व देत पुरुषप्रधान व्यवस्थेला आवाहन देणारी संस्कृती होय. स्त्रीचे माणूस म्हणून असणारे स्थान, तिचे स्वातंत्र्य आणि समान अधिकार या मुल्यांना प्रोत्साहन देणारी सामाजिक जाणीव स्त्रीवादात व्यक्त होते. स्त्रीवादी साहित्य प्रवाहात स्त्रीकेंद्रित दुष्टिकोन, माणूस म्हणून चित्रण, सामाजिक व सांस्कृतिक बदलांचे प्रतिबिंब, विविध अनुभवांची अभिव्यक्ती आणि स्वतःचा शोध अभिप्रेत होतो. स्त्रीवादी साहित्यातून स्त्रीला माणूस म्हणून समान स्थान व तिच्या न्याय हक्कासाठी आणि स्वातंत्र्यासाठी प्रोत्साहन देणारी संस्कृती दिसून येते.

**मुस्लिम साहित्य:**

महाराष्ट्रात बहामनी, आदिलशाही, निजामशाही काळापासून मुस्लिम संस्कृती व मराठी भाषा एकत्रीत नांदते आहे. अठराव्याएकोणिसाव्या शतकात मुस्लिम कवीलेखकांनी मराठी भाषेत धार्मिक, भक्तिपर, सामाजिक स्वरूपात लेखन केले. शेरशायरी, गझल,

कव्वाली यांसारख्या रूपांतून मराठी साहित्य समृद्ध केले. अमीरखान, मलिक मोहम्मद, मलिक सिद्धिकी, शाहीर अमर शेख, हमीद दलवाई यांचे मुस्लिम साहित्यातील योगदान सुधारणावादी आहे. मुस्लिम मराठी साहित्यात महाराष्ट्राची समृद्ध आणि बहुधार्मिक संस्कृती तसेच मुस्लिम समाजाचे जीवन व्यक्त होते. त्यांची मराठी भाषेवरील निष्ठा देखिल व्यक्त होते. या साहित्यातून अस्सल मराठी मातीचा गंध येतो. ते साहित्य परस्परांबददल प्रेम आणि सामाजिक सलोखा दर्शविते. मुस्लिममराठी लोकांची ओळख, त्यांची भाषा व संस्कृती आणि मराठी साहित्यातील स्थान यांची माहिती मिळते. या साहित्यातून महाराष्ट्राची संस्कृती, बहुधार्मिकता, मराठी भाषेवरील निष्ठा, धार्मिक सलोखा व समन्वय दिसून येतो. मुस्लिम साहित्याने ऐतिहासिक व सामाजिक सुधारणावादी भाष्य केले आहे. हमीद दलवाई यांनी साहित्यातून मुस्लिम समाजातील सामाजिक व धार्मिक सुधारणांवर प्रकाश टाकला. अमरशेख यांनी कामगारशेतकरी चळवळीतून सशक्त लोकसाहीत्य निर्माण केले. अब्दूल दलवाई, मिराजकर यांनी गझल, कथा व लिखांमधून सामाजिक सुधारणा, शिक्षण, समता व धर्मनिरपेक्षता हा विचार अभिव्यक्त केला.

**सारांश:**

मराठी साहित्यातील विविध वाङ्मयीन प्रवाहांनी मोठे सांस्कृतिक योगदान दिले आहे. ग्रामीण साहित्याने ग्रामीण जीवनातील साध्या पण वास्तववादी अनुभवांना समोर आणले. या भागातील जीवन, संस्कृती, व सामाजिक समस्यांचे चित्रण आल्याने साहित्यास नवी दिशा मिळाली. दलित साहित्याने समाजघटकांच्या वेदना व अनुभवांस वाचा फोडली. लोकांत मानवीहक्क आणि सामाजिक न्यायाची संस्कृती या साहित्याने निर्माण केली. आदिवासी साहित्याने लोकांचे हलाखीचे जीवन सर्वांसमोर आणले. रूढी, परंपरा आणि विविध प्रथा लक्षात आल्या. संस्कृती जोपासण्याबरोबरच निसर्ग संवर्धनाची असणारी गरज लोकांत रुजवण्यास मदत केली. स्त्रीवाद्यांनी पुरुषसत्ताक व्यवस्थेचे समाजसंस्कृतीवर असणारे वर्चस्व झुगारून सामाजिक संरचनेचा शाश्वत व संस्कृतीचा प्रवाहीपणा सुरू केला. मुस्लीम साहित्यिकांनी मराठी भाषाप्रेम, धार्मिक सलोखा व संस्कृती जोपासण्याचा प्रयत्नवाद सुरू केला.

एकूणच, मराठी साहित्य हे महाराष्ट्रातील लोकांचे जीवन, त्यांचे विविध सण, उत्सव, सामाजिकधार्मिक श्रद्धा, निसर्गाशी असलेले नाते आणि प्रादेशिक विविधता यांसारखे संस्कृतीचे पैलू आपल्यासमोर मांडते.

## संदर्भ:

1. मंचरकर, र. बा, 'सामाजिक परिवर्तन आणि मराठी साहित्य', पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २०११
2. मेश्राम, केशवे, 'वाङ्मयीन प्रवृत्तीः तत्वबोध', प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २००७
3. मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड७, भाग२
4. कुलकर्णी, गो.ग, 'साहित्य : दलित व ललित', नूतन प्रकाशन, पुणे.
5. मराठी संज्ञा संकल्पना कोश : संपा. वसंत आबाजी डहाके, प्रभा गणोरकर
6. पोवार, गो. मा, 'मराठी साहित्य : प्रेरणा व स्वरूप' (संपादन)
7. प्रदक्षिणा खंड १ व २, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.

**Funding:**

This study was not funded by any grant.

**Conflict of interest:**

The Authors have no conflict of interest to declare that they are relevant to the content of this article.

**About the License:**

© The Authors 2024. The text of this article is open access and licensed under a Creative Commons Attribution 4.0 International License.